<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 19 जानेवारी 2018 रोजी भरलेल्या माहे जानेवारी 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01 दिनांक 19 जानेवारी 2018** | **इतिवृत्त** - 24 ऑक्टोबर 2017 (मुळ सभा - 19 सप्टेंबर 2017) |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 02 दिनांक 19 जानेवारी 2018** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03 दिनांक 19 जानेवारी 2018** | (अ) स्थायी समितीच्या सदस्य पदाचा राजीनामा देणारे श्री. विजय लक्ष्मण चौगुले यांचे दिनांक 03/01/2018 चे पत्र.<br>(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 23 सह वाचावयाच्या कलम 31-अ (1) व (2) अन्वये नामनिर्देशनाद्वारे उर्वरीत कालावधीकरीता स्थायी समिती सदस्य पदाच्या रिक्त झालेल्या एका जागेवर नव्याने सदस्य नेमणूक करणे. |
| **ठराव क्र.06 दिनांक 19 जानेवारी 2018.** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्य पदाच्या रिक्त झालेल्या एका जागेवर सन 2017-2019 च्या उर्वरीत कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 23 सह वाचावयाच्या कलम 31-अ (1)व(2) अन्वये, नामनिर्देशनाद्वारे रितसर नेमणूक करण्यात येत आहे. |
| **निर्णय** | **स्थगित.** |
| **विषय क्र. 04. दिनांक 19 जानेवारी 2018.** | **स्थायी समितीचा, दिनांक 03 जानेवारी 2018 चा ठराव 227:-**<br><br>संदर्भ:-आयुक्तांचे दि.30/11/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/लेखा/2091/ 2017.<br>महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, सन 2017-18 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये उपरोक्त (अ) मधील अनु.क्र. 1 ते 22 नुसार प्रस्तावित वाढ रु 4692.00 लक्ष व (ब) मधील अ.क्र. 1 ते 10 नुसार प्रस्तावित घट 4692.00 लक्ष, असा एकत्रित मूळ मंजूर अर्थसंकल्पीय जमा-खर्चाच्या रु. 298702.90 लक्ष रक्कमेच्या तरतूदीवर निरंक परिणाम करणारा पुर्नविनियोजन प्रस्तावास अंतीम मंजूरी देण्यात यावी. |
| **ठराव क्र.07. दिनांक 19 जानेवारी 2018.** | "सन 2017-18 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये उपरोक्त (अ) मधील अनु.क्र. 1 ते 22 नुसार प्रस्तावित वाढ रु 4692.00 लक्ष व (ब) मधील अ.क्र. 1 ते 10 नुसार प्रस्तावित घट 4692.00 लक्ष, असा एकत्रित मूळ मंजूर अर्थसंकल्पीय जमा-खर्चाच्या रु. 298702.90 लक्ष रक्कमेच्या तरतूदीवर निरंक परिणाम करणारा पुर्नविनियोजन प्रस्तावास अंतीम मंजूरी देण्यात यावी" |
| **निर्णय** | **मंजूर** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 19 जानेवारी 2018 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** नवी मुंबईच्या क्षेत्रात ठिकठिकाणी बेंचेस बसविले असताना फक्त प्रभाग क्र.83, जुईनगरसाठी वेगळा नियम लागु करून प्रभाग निधीतून प्रस्तावित केलेले बेंचेसचे विनाकारक नामंजूर केलेले काम त्वरीत मंजूर करावे व नागरिकांच्या मागणीनुसार ठिकठिकाणी बेंचेस बसवावेत तसेच प्रभागनिधी व नगरसेवक निधीचे कोणतेही काम नामंजूर करण्यावर निर्बंध लावणे. | 5 / जानेवारी | 8 / 19/01/2018 | मंजूर |
| 2. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र.83, जुईनगर अंतर्गत ग्रामपंचायत कालिन मोडकळीस आलेली जुनी व्यायाम शाळा तोडून तेथे नागरिकांसाठी लसीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम, अंगणवाडी व व्यायमशाळा यासाठी एक बहुउद्देशीय इमारत बनविणे. | 6 / जानेवारी | 9 / 19/01/2018 | मंजूर |
| 3. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** "महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांना महापालिका गणवेश व वह्यापुस्तके देत असल्याने शिष्यवृत्ती मिळत नाही. पण आता पालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पालिकेला खर्च करावी लागणारी रक्कम व मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम यात बरीच तफावत निर्माण झाली असल्याने पालिकेच्या हुशार विद्यार्थ्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी निदान शिष्यवृत्तीची अर्धी रक्कम तरी शिष्यवृत्ती म्हणून पालिकेच्या शाळांतील हुशार विद्यार्थ्यांना मिळू शकले अशी योजना काढुन तशी तरतूद अर्थसंकल्पात करणे. | 7 / जानेवारी | 10 / 19/01/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** श्रमिकनगर खैरणे एम.आय.डी.सी. येथील सर्व घरांना पाणीपुरवठा करण्यासाठी अंतर्गत व उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे. | 8 / जानेवारी | 11 / 19/01/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** "पावणेगांव येथील विद्युत दिवे व्यवस्था सुधारणा करणे व विद्युत दिवे एल.ई.डी. दिवे बसविणे, विद्युत हायमास्ट दिवे सुधारण करणे, एल.ई.डी. विद्युत दिवे लावणे. | 9 / जानेवारी | 12 / 19/01/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** पावणेगांव येथे व्यायमशाळा सुरू करणे, व्यायाम साहित्य आधुनिक व्यायाम साहित्य मशिन उपलब्ध करणे तसेच योगा प्रशिक्षण वर्ग सुरू करणे. | 10 / जानेवारी | 13 / 19/01/2018 | मंजूर |
| 7. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे से.13 मधील भूखंड क्र.11 सिडकोकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यावर तेथे तीन मजली बहुउद्देशीय इमारत उभारणे. | 11 / जानेवारी | 14 / 19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, कोपरखेरणे से.12 मधील स्मशान भूमीच्या मागील जागेवर बिना रहदारीच्या जागेवर फेरीवाले बसतात त्यांना तो भूखंड फेरीवाला क्षेत्र म्हणून अधिकृत करून देणे. | 12<br>जानेवारी | 15<br>19/01/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे से.12 मधील कै.शंकरशेठ नाईक ही समाज मंदिर इमारत प्रभागातील गरजु संस्थेला भाडेतत्वावर देणे. | 13<br>जानेवारी | 16<br>19/01/2018 | मंजूर |
| 10 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>"निर्धारित वेळेत बांधकाम पूर्ण होऊन ही सदर बांधकामाचा पूर्णत्वाचा दाखला (ओ.सी.) प्राप्त करून घेण्यासाठी नागरिकांना महानगरपालिकेच्या विविध विभागांचे ना हरकत दाखले विहीत वेळेत मिळत नसल्यामुळे नागरिकांना सिडकोकडून टाईम एक्सटेन्शन घ्यावे लागते. त्याकरिता आर्थिक भूर्दंड नागरिकांना सोसावा लागतो. तेव्हा महानगरपालिकेच्या विविध विभागांचे ओ.सी. करिता लागणारे सर्व ना हरकत दाखले महापालिकेने एक खिडकी योजनेप्रमाणे स्वत:च प्राप्त करून घ्यावेत. जेणेकरून नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास होणार नाही. तसेच ना हरकत दाखले देण्याकरिता होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसेल | 14<br>जानेवारी | 17<br>19/01/2018 | मंजूर |
| 11 | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 103, सी.बी.डी. मध्ये महानगरपालिकेची शाळा क्र. 4 येथे इयत्ता 8 वी पर्यत शाळा असून आजूबाजूला शाळा नसल्यामुळे अनेक मुलांना इयत्ता 8 वी नंतर शाळा सोडून घरी बसावे लागत आहे. या ठिकाणी अल्प उत्पन्नाचे लोक असल्यामुळे येथे शिक्षणची खुप गरज आहे आणि पालक मुलांना बाहेर शाळेत पाठवू शकत नाहीत. तरी लवकरात लवकर इयत्ता 9 व 10 वीचे वर्ग सुरू करणे. | 15<br>जानेवारी | 18<br>19/01/2018 | मंजूर |
| 12 | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103, सी.बी.डी मध्ये असलेले कस्तुरबा उद्यान व सेक्टर 8ए येथील असलेले सिडकोकालीन गटार व पदपथ नादुरूस्त अवस्थेत असल्यामुळे तो कॉंक्रीटीकरणाने गटार व पदपथ बनविणे. | 16<br>जानेवारी | 19<br>19/01/2018 | मंजूर |
| 13 | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103, सी.बी.डी. येथील संभाजी नगर ते दुर्गामाता नगर येथील पावसाळी नाल्याचे काम अपूर्ण असल्यामुळे ग्रीन व्हॅाली सोसायटी व अष्टविनायक सोसायटी यांना पावसाळी पाण्याचा खुप त्रास असून पावसाळी नाला संभाजीनगरच्या मुख्य नाल्याशी जोडणे. | 17<br>जानेवारी | 20<br>19/01/2018 | मंजूर |
| 14 | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 89, शिरवणे येथे कमी व्यासाच्या जलवाहिन्या असून विदयामान स्थितीत त्या अपु-या पडत आहेत. तरी सदर भागात जास्त व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे. | 18<br>जानेवारी | 21<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**<br>जुईनगर रेल्वे स्टेशनचे जुईनगर-शिरवणे स्थानक असे नामकरण करण्यात यावे या संदर्भात रेल्वे प्रशासनाकडे मा. आयुक्त महोदयांनी शिफारस करणे. | 19<br>जानेवारी | 22<br>19/01/2018 | मंजूर |
| 16 | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 89, शिरवणे येथे नव्याने मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्यात यावी. | 20<br>जानेवारी | 23<br>19/01/2018 | मंजूर |
| 17 | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**<br>नवी मुंबईतील सर्व झोपडी धारकांना घरगुती नळ कनेक्शन देणे. | 21<br>जानेवारी | 24<br>19/01/2018 | मंजूर |
| 18 | **श्री. जगदिश नाना गवते यांजकडून :-**<br>नवी मुंबईतील मुकुंद कंपनी येथे रोड कॉसिंग साठी स्काय वॉक बांधणे. | 22<br>जानेवारी | 25<br>19/01/2018 | मंजूर |
| 19 | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मध्ये सेक्टर -18 येथे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून येथे सम/विषम प्रमाणात पार्किग व्यवस्था करणे. | 23<br>जानेवारी | 26<br>19/01/2018 | मंजूर |
| 20 | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मधील सिमेंटची कव्हर नादुरुस्त अवस्थेत असून त्याजागी एफ.आर.बी. ची कव्हर बसविणे. | 24<br>जानेवारी | 27<br>19/01/2018 | मंजूर |
| 21 | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मधल्या रस्त्यांची अवस्था अतिशय दयनिय झाली असून त्यांचे संपूर्ण डांबरीकरण करणे. | 25<br>जानेवारी | 28<br>19/01/2018 | मंजूर |
| 22 | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>मनपाने घणसोली सेक्टर 1 ते 9 या क्षेत्रात इंटीग्रेटेड तत्वाने नागरी सेवा सुविधांच्या निविदा कामांसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेला ठेकेकदारांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने रस्ते, पदपथ, नाली, गटारांच्या, दिवाबत्तीच्या सोई सुविधांच्या समस्यांवर उपाययोजना होण्यास दिरंगाई होत आहे. त्यामुळे स्थानिक करदात्या जनतेला भीषण समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने घणसोली सेक्टर 1 ते 9 या क्षेत्रातील रस्ते, पदपथ, नाली गटारांच्या, दिवाबत्तीच्या सोई सुविधांची कामे ही सेक्टर निहाय अथवा प्रभाग निहाय करण्यासाठीच्या कामांचे प्रस्ताव बनवून निविदा कामे करण्याची पुर्तता करणे. | 26<br>जानेवारी | 29<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>मनपाच्या नियम नियमावलीत निमयबाह्य बेकायदेशीरपणे विना परवानगी पक्षी प्राण्यांची कत्तल करणे व मांस जन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर फौजदारी कारवाई करण्याची तरतूद नसल्याने मनपाचा संबंधित विभाग हतबल झालेला आहे. यांची मनपाने नोंद, दखल घेऊन शहराची पालक संस्था या अधिकारात, उत्तरदायित्व जबाबदारीने नियमबाह्य बेकायदेशीरपणे विना परवानगी पक्षी प्राण्यांची कत्तल करणे व मांस जन्य पदार्थांची विक्री करणे अशा कृत्यामुळे शहराचे स्वास्थ्य व नागरीकांच्या आरोग्यास जिवितास धोकादायक परिस्थिती निर्माण केली जात असल्याच्या कारणास्तव संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही व कारवाई करणे. | 27<br>जानेवारी | 30<br>19/01/2018 | मंजूर |
| 24 | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>महापालिकेने नागरी सेवा सुविधांशी निगडीत असणाऱ्या मनपाच्या बहुतांश सर्व विभागांचे परिमंडळ निहाय विभाजन केलेले असल्याने प्रभाग समितीच्या बैठका या परिमंडळ कार्यालयांमध्ये घेण्याची तरतूद करणे. | 28<br>जानेवारी | 31<br>19/01/2018 | मंजूर |
| 25 | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 74, सानपाडा मध्ये सायन पनवेल महामार्गावरील पादचारी पुल हा कित्येक वर्षापासून अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करत असलेल्या हजारो कामगार बंधू भगिनींना जीव मुठीत घेवून हा महामार्ग पार करावा लागत असल्यामुळे कित्येकदा लहान सहान अपघातांना समोरे जावे लागत आहे. तरी सदर पादचारी पुलाचे काम लवकरात लवकर मार्गी लावून सदर पादचारी पुल सानपाडा अंडरपासपर्यंत करणे. | 32<br>जानेवारी | 32<br>19/01/2018 | मंजूर |
| 26 | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**<br>सानपाडा आरटीओ सर्कल ते जुईनगर रेल्वे स्टेशनपर्यंतच्या रस्त्यालगत पादचारी प्रवाशांकरिता पायी प्रवास करण्यासाठी कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे सदर रस्त्यावरूनच समस्त पादचारी वर्गास पायपीट करावी लागत असल्यामुळे सदर ठिकाणी नेहमीच लहान सहान अपघात होत असतात तरी सदर रस्त्यालगत पादचारी पथ उभारणे. | 33<br>जानेवारी | 33<br>19/01/2018 | मंजूर |
| 27 | **श्री. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**<br>सानपाडा से.4 मधील श्री दत्तगुरू, कस्तुरी, सप्तपर्णी, अश्वथा सोसायटीतील समस्त सदनिकाधारक सततच्या घरफोडीमुळे बेजार झाले आहेत. तरी सदर ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गेट बांधण्यात यावा. तसेच सदर ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे. | 34<br>जानेवारी | 34<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 28 | **श्री. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**<br>सानपाडा से.5 येथील गावठाण विस्तार योजनेंतर्गत असलेले सर्व सदनिकाधारक अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. सदर ठिकाणी असलेल्या पिण्याच्या पाईप लाईन ह्या सिडको कालीन लहान व्यासाच्या असल्यामुळे याद्वारे पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. तरी सदर ठिकाणी असलेल्या पाईप लाईन बदलुन नविन मोठ्या व्यासाच्या पाईप लाईन टाकणे. | 35<br>जानेवारी | 35<br>19/01/2018 | मंजूर |
| 29 | **श्री. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**<br>सानपाडा से.4 मधील श्री दत्तगुरू, कस्तुरी, सप्तपर्णी, अश्वथा सोसायटीतील सदनिकाधारक हे वैयक्तिक भूखंडाचे मालक असून त्यांना सानपाडा से.4 येथील मुख्य जलकुंभावरून पाणीपुरवठा होत आहे. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी बहुतांश जणांनी आपल्या भूखंडाची पुर्नबांधणी केल्यामुळे तेथील रहिवाशीयांचे पाण्यामुळे वाद विवाद होत आहेत. तरी सदर ठिकाणी असलेल्या सदनिकाधारकांच्या मागणीस्तव तेथील प्रत्येक सदनिकाधारकास वैयक्तिक पाणी पुरवठा जोडणी करणे. | 36<br>जानेवारी | 36<br>19/01/2018 | मंजूर |
| 30 | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागातील विद्युत वायर भुमिगत करणे. | 37<br>जानेवारी | 37<br>19/01/2018 | मंजूर |
| 31 | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडून नवीन नळ जोडणी केल्यावर पाणी मीटरकरिता शुल्क घेते किंवा बाहेरून शुल्क देऊन मिटर आणावा लागतो. तो पुर्ववत नि:शुल्क पाणी मीटर महानगरपालिकेकडून देणे. | 38<br>जानेवारी | 38<br>19/01/2018 | मंजूर |
| 32 | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे संपूर्ण प्रभागात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. | 39<br>जानेवारी | 39<br>19/01/2018 | मंजूर |
| 33 | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगांव से.11 येथील साईबाबा मंदिर ते कै. सोमा कंबा पाटील येथील रस्त्याची दुरूस्ती करून तेथे डांबरीकरण करणे. | 40<br>जानेवारी | 40<br>19/01/2018 | मंजूर |
| 34 | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगांव से.11 वाशी नवी मुंबई येथील खंडोबा मंदिर ते श्री. मोतिराम पाटील निवास येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी बदलून तेथे मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरब्लॉक बसविणे. | 41<br>जानेवारी | 41<br>19/01/2018 | मंजूर |
| 35 | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगाव वाशी से.11 नवी मुंबई येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै.राधा सुदाम भोईर निवास बिल्डींग येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी बदलून तेथे मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरब्लॉक बसविणे. | 42<br>जानेवारी | 42<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36 | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16ए, 16 व 18 येथील संपूर्ण रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 43 / जानेवारी | 43 / 19/01/2018 | मंजूर |
| 37 | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16ए, 16 व 18 येथील सर्व चौकात मोठे सुचना फलक बसविणे. | 44 / जानेवारी | 44 / 19/01/2018 | मंजूर |
| 38 | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर 16ए, 16 व 18 येथे आवश्यक त्या ठिकाणी मोठे हायमास्ट आणि मिनी हायमास्ट बसविणे. | 45 / जानेवारी | 45 / 19/01/2018 | मंजूर |
| 39 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 79, सानपाडा येथील सेक्टर 11, भूखंड क्र. 1 येथे लवकरात लवकर 21 व्या शतकातील आधुनिक स्वरूपातील मध्यवर्ती ग्रंथालय बनविणे. | 46 / जानेवारी | 46 / 19/01/2018 | मंजूर |
| 40 | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, तळवली गांव परिसरामध्ये उर्वरित ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करून त्यांची सुधारणा करणे. | 47 / जानेवारी | 47 / 19/01/2018 | मंजूर |
| 41 | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, तळवली गांव मध्ये नागरिकांच्या सोयीसाठी मार्केटची व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना खरेदीसाठी दूरवर जावे लागते. याकरिता घणसोली सेक्टर-21 मधील भूखंड क्रमांक 80 सिडकोकडून महानगरपालिकेकडे हस्तांतर करून त्याठिकाणी नागरिकांना सोयीकरिता मार्केटची व्यवस्था करणे. | 48 / जानेवारी | 48 / 19/01/2018 | मंजूर |
| 42 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-** “ई” विभाग कार्यालय कोपरखैरणे परिसरामध्ये कॉंक्रीटीकरण आणि सुशोभिकरण करणे. | 49 / जानेवारी | 49 / 19/01/2018 | मंजूर |
| 43 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरण मधील “चिकणेश्वर” बस डेपोचे मुख्य प्रवेशद्वार बनविणे. | 50 / जानेवारी | 50 / 19/01/2018 | मंजूर |
| 44 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील सेक्टर 03 येथील “चिकणेश्वर” उद्यानामध्ये जॉगिंग ट्रॅक बनविणे. | 51 / जानेवारी | 51 / 19/01/2018 | मंजूर |
| 45 | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून:-** प्रभाग क्र. 80, शिवाजीनगर, नेरूळ औद्योगिक परिसरातील ठिकाण भूखंड क्र. डी 222/8 ते भूखंड क्र. डी 510 पर्यंत व भूखंड क्र. डी 33 ते डि 405 ह्या भूखंडा समोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करून गेली दोन ते तीन वर्ष झाली आहेत. तरी सुध्दा ह्या रस्त्यावर पथदिवे उभारले नाहीत. ह्या परिसरात रात्रीच्या अंधारामुळे रस्त्यावर अपघात होत आहेत, व नागरिकांना लुटमारीचे प्रकार घडत आहेत. तरी वरील ठिकाणी रस्त्यावर नवीन पथदिवे बसविणे. | 52 / जानेवारी | 52 / 19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 46 | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र. 80, शिवाजीनगर, नेरूळ, औद्योगिक परिसरातील डि ब्लॉक मध्ये मोठ्या प्रमाणात शोरूम, गॅरेज, सर्विस सेंटर आहेत. आज रोजी येथील रस्ते, गटारे, फुटपाथ यांची खूपच दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर जागोजागी खडड्े असुन रस्त्याची अक्षरश: चाळणी झाल्याचे दिसत आहे. रस्त्यात खडडा् की खड्यात रस्ते हे पण समजत नाही. तरी येथील औद्योगिक डी ब्लॉक परिसरातील रस्ते, गटार, फुटपाथ बनविणे. | 53<br>जानेवारी | 53<br>19/01/2018 | मंजूर |
| 47 | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र. 80, शिवाजीनगर नेरूळ, औद्योगिक डि ब्लॉक परिसरात मोठ्या प्रमाणात शोरूमस, गॅरेज, टँकर व्यवसायिक आहेत. ह्या परिसरात मोठ्या प्रमाणात अपघाती वाहने रस्त्याच्या दुतर्फा पार्किंग करून वर्षानोवर्ष धुळ खात पडली आहेत. त्यामुळे या परिसरात वारंवार वाहतुक कोंडी व अपघात होत आहेत. ह्या विषयाबाबत संबंधित विभागास वारंवार तक्रारी पत्रे देण्यात आली आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमाणे रस्त्यावर बेवारस वाहने उचलुन कालावधी प्रमाणे समंस देऊन त्यानंतर त्या वाहनांची लिलावा मार्फत विक्री करून कोट्यावधी रूपये महापालिकाच्या महसुलात वाढ केली आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेने नव्याने टोईंग वाहन खरेदी करावेत. बृहन्मुंबई महापालिका प्रमाणे नवी मुंबई महापालिकेने कारवाई करावी व आपल्या महापालिकेच्या महसूल मध्ये वाढ करावे व ह्या परिसरातील रस्ते मोकळे करणे. | 54<br>जानेवारी | 54<br>19/01/2018 | मंजूर |
| 48 | **श्री. जयाजी के. नाथ, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय वास्तु ही देशातील वास्तुरचनेचा एक उत्तम नमुना मानला जात असून अनेक वैशिष्ट्यपुर्ण गोष्टी त्यात असल्याने देशाविदेशातील नागरिक या वास्तुस भेट देत असतात. या ठरावाद्वारे असे सुचवू इच्छितो की, या इमारतीत आल्यानंतर नागरिकांना बघण्यासाठी उपलब्ध होईल. अशा वस्तुंचा संग्रह करण्यात यावा. जसे की, नवी मुंबई महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महापालिकेची पहिली महासभा झाली त्या महासभेचे इतिवृत्त राजमाता जिजाऊ सभागृहात स्मारक रूपात ठेवण्यात यावे, तसेच नवी मुंबई महानगरपालिका स्थापन झाल्यापासून गेल्या 25 वर्षाच्या कालावधीत पालिकेच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत महापालिकेस आजवर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्या पुरस्कारांची गॅलरी स्वरूपात दर्शनीय भागात मांडणी करणे. | 55<br>जानेवारी | 55<br>19/01/2018 | मंजूर |
| 49 | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 64 अंतर्गत वाशी सेक्टर-8अ, येथे होल्डिंग पॉंड जवळच्या परिसरात भरपूर दुर्गंधी पसरली आहे. होल्डिंग पॉंडची सफाई न झाल्याकारणाने ही दुर्गंधी पसरलेली आहे. तरी होल्डिंग पॉंडचा गाळ काढून सफाई करणे. | 56<br>जानेवारी | 56<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 50 | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 64 अंतर्गत सेक्टर-1अ, 3, 4, 5, 6, 7 व 8 मधील अंतर्गत रस्ते एम.जी.एल, एम.एस.ई.बी., पाणी विभाग, वोडाफोन, रिलायन्स यांच्या खोदकामामुळे रस्त्यांची अवस्था अतिशय खराब झालेली आहे. तरी सेक्टर-1अ, 3, 4, 5, 6, 7 व 8 मधील अंतर्गत नव्याने रस्त्यांची सुधारणा करणे. | 57<br>जानेवारी | 57<br>19/01/2018 | मंजूर |
| 51 | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत एम.आय.डी.सी.चे क्षेत्र येते. एम.आय.डी.सी.च्या हद्दीत सी.ई.टी.पी प्लान्ट आहे. एम.आय.डी.सी., सी.ई.टी.पी. व एमपीसीबी च्या पर्यावरण विषयी संयुक्त बैठका होत असतात. या संयुक्त बैठकांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण तदर्थ समिती सभापती यांच्या सुध्दा समावेश करणे. | 58<br>जानेवारी | 58<br>19/01/2018 | मंजूर |
| 52 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>ठाणे बेलापूर पट्टीतील घणसोली हे सर्वाधिक मोठे तसेच ऐतिहासिक गांव असुन सदर गावासाठी सिडकोकडून आगरी-कोळी भवनासाठी भुखंड उपलब्ध करून लवकरात लवकर त्याची निर्मिती करणे. | 64<br>जानेवारी | 59<br>19/01/2018 | मंजूर |
| 53 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>घणसोली गांव, तळवली गांव, राबाडा गांव गोठीवली गांव परिसरात नागरिकांसाठी एकही उद्यान उपलब्ध नाही. तसेच विरंगुळा केंद्र नाही, नाना-नानी पार्क नाही, अभ्यासिका, वाचनालय नाही, समाजमंदिर, व्यायामशाळा, खेळाचे मैदान नाही. सिडकोकडून घणसोली नोड हस्तांतरण झाला असून, लवकरात लवकर परिसरातील नागरिकांसाठी वरील सुविधा उपलब्ध करून देणे. | 65<br>जानेवारी | 60<br>19/01/2018 | मंजूर |
| 54 | **श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**<br>घणसोली सेक्टर 8, स्मशान भुमी सुशोभिकरण व मुख्य प्रवेशद्वार बनवुन तसेच घणसोली विभाग कार्यालयाजवळील स्मशान भुमीचे सुशोभिकरण करून निवारा शेड, बसण्यासाठी बॅचेसची व्यवस्था व हात धुण्यासाठी व्यवस्था करणे. | 66<br>जानेवारी | 61<br>19/01/2018 | मंजूर |
| 55 | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका 2015 ची निवडणूक झाल्यानंतर नगरसेवकांनी वेळोवळी प्रत्येक महिन्यात ठराव मांडले असून, मागील अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये कोणकोणत्या नगरसेवकांनी कोणकोणते ठराव मांडले व त्यावर प्रशासनाने काय कारवाई केली याबाबत अडीच वर्षाचा अहवाल प्रत्येक नगरसेवकास प्रिंट करुन यापूर्वीच्या कालखंडामध्ये प्रशासनामार्फत असा अहवाल दिला होता. त्याचप्रमाणे हा अहवाल देणे. | 67<br>जानेवारी | 62<br>19/01/2018 | मंजूर |
| 56 | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेचे 1995 पासूनचे माजी महापौर झाले, त्या महापौरांचे छायाचित्र व कालावधी महापौर दालनाच्या बाहेर लावणे. | 68<br>जानेवारी | 63<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 57 | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेने फिटनेस सेंटरची व्याख्या परिभाषित केलेली आहे. DCR (3.55) ज्या ठिकाणी फिटनेस सेंटर दिली आहेत. तेथे अशा जागांचा वापर महानगरपालिका ठरविल अशा पध्दतीने वापरता येईल चांगल्या आरोग्यासाठी व्यायामाची आवश्यकता आहे. मात्र त्या ठिकाणी सामाजिक बाबींची जोड यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. सर्व सोसायटी सदस्य फिटनेस सेंटरचा 24 तास 365 दिवस शारीरिक व्यायामासाठी उपभोग घेत नाहीत. सध्या आधुनिक व्यायामशाळा सुध्दा आवठड्यातुन एका दिवसासाठी बंद ठेवण्यात येतात. त्या अनुषंगाने फिटनेस सेंटरचा वापर सामाजिक कार्यक्रमासाठी किमान 24 दिवस वर्षातून किंवा महिन्यातून 02 दिवस फिटनेट सेंटरमध्ये परवानगी देणे इष्ट राहील. गृहनिर्माण सहकारी संस्थेतील कार्यकारी समितीने ठरविलेले सामाजिक कार्यक्रम अशा ठिकाणी आयोजित करण्याकरीता मंजूरी देणे. | 69<br>जानेवारी | 64<br>19/01/2018 | मंजूर |

| | |
|---|---|
| **ता.का.क्र. 36.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | कोपरखैरणे विभागातील खैरणेगाव येथील दिवाबत्ती सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा//श.अ./78/2018. |
| **ठराव क्र. 65.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | "कोपरखैरणे विभागातील खैरणेगाव येथील दिवाबत्ती सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 47 लाख, 99 हजार 802 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **ता.का.क्र. 37.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | सेक्टर-19, नेरूळ येथील कै.यशवंतराव चव्हाण क्रिडांगणातील फुटबॉल मैदान वापराचे धोरण व भाडेशुल्क दर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ./44/2018. |
| **ठराव क्र. 66.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | "सेक्टर 19, नेरूळ येथील कै. यशवंतराव चव्हाण क्रीडांगणातील फुटबॉल मैदान वापराचे धोरणे व भाडेशुल्क दर निश्चित करणेसच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458(41) नुसार नगरपालिका प्राधिकरणाने दिलेल्या सेवेच्या आकाराचे नियमन करण्याची तरतूद आहे, त्यानुसार प्रस्तावातील दरपत्रक तक्त्यातील अ.क्र. 1 ते 6 नुसार उपरोक्त अटी व शर्तीस अनुसरुन भाडेशुल्क दर लागू करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे परत.** |
| **ता.का.क्र. 38.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | सी.बी.डी. सेक्टर-3, येथील भारतरत्न स्व.राजीव गांधी क्रीडा संकुलातील मैदान वापराकरीता सुधारित धोरण व दर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ./45/2018. |
| **ठराव क्र. 67.<br>दिनांक 19 जानेवारी 2018.** | "सी.बी.डी. सेक्टर-3, येथील भारतरत्न स्व.राजीव गांधी क्रीडा संकूलातील मैदान वापराकरीता सुधारीत धोरण व दर निश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458(41) नुसार नगरपालिका प्राधिकरणाने दिलेल्या सेवेच्या आकाराचे नियमन करण्याची तरतूद आहे, त्यानुसार प्रस्तावातील तक्त्यातील अ.क्र. 1 ते 13 मधील सुधारीत दरपत्रकास उपरोक्त अटी व शर्ती अनुसरुन सुधारीत दर लागू करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **क्रिडा समितीकडे परत.** |

| | |
|---|---|
| **ता.का.क्र. 39.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | नेरूळ टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील उरणफाटा ते तुर्भे फ्लायओव्हर पर्यंतच्या सर्व्हिस रस्त्याची कॉक्रीटीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./102/2018. |
| **ठराव क्र. 68.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "नेरुळ टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील उरणफाटा ते तुर्भे फ्लायओव्हर पर्यंतच्या सर्व्हिस रस्त्याची कॉक्रिटीकरणाने सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 41कोटी, 88लाख, 22 हजार 699 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 40.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | भूखंड क्र. 239, सेक्टर-4, घणसोली येथे नागरी आरोग्य केंद्र बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./104/2018. |
| **ठराव क्र. 69.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "भुखंड क्र. 239, सेक्टर-4, घणसोली येथे नागरी आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 16 लाख, 82 हजार 498 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 41.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | बेलापूर विभागातील भु.क्र. 6 से. 1ए येथे नवीन अग्निशमन केद्र संकूलाची इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./113/2018. |
| **ठराव क्र. 70.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "बेलापूर विभागातील भु.क्र. 6, से.1ए येथे नवीन अग्निशमन केंद्र संकुलाची इमारत बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 6 कोटी, 29 लाख, 40 हजार 377 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 42.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | घणसोली विभागातील नमुमपा शाळा क्र. 55 व 104 शाहू महाराज विदयालयाची रंगरंगोटी करुन सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./114/2018. |
| **ठराव क्र. 71.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "घणसोली विभागातील नमुंमपा शाळा क्र. 55 व 104 शाहू महाराज विदयालयाची रंगरंगोटी करुन सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 49 लाख, 53 हजार 519 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 43.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | नेरुळ विभागातील से. 03 व से-15 येथील अंतर्गत रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./115/2018. |
| **ठराव क्र. 72.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "नेरुळ विभागातील से.3 व से. 15 येथील अंतर्गत रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 53 लाख, 96 हजार 174 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 44.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | कोपरखैरणे विभागातील खैरणे तलावलगत रस्त्यांचे रुंदीकरण करणे व तलावाचे सुशोभिकरण करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./116/2018. |
| **ठराव क्र. 73.** **दिनांक 19 जानेवारी 2018.** | "कोपरखैरणे विभागातील खैरणे तलावालगत रस्त्यांचे रुंदीकरण करणे व तलावाचे सुशोभिकरण करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 94 लाख, 66 हजार 281 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **ता.का.क्र. 45.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | नेरुळ विभागातील से. 10 व 10अे येथील रस्ते , गटर व मलनि:स्सारण वाहिन्यांची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./117/2018. |
| **ठराव क्र. 74.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "नेरुळ विभागातील से-10 व से-10अे येथील रस्ते, गटर व मलनि:स्सारण वाहिन्यांची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 33 लाख, 04 हजार 333 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 46.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | नेरुळ विभागातील जुईनगर से. -23 व जुईपाडज्ञ गांव अंतर्गत रस्त्यांची डांबरीकरण करणे व उर्वरीत गटर पदपथांची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./118/2018. |
| **ठराव क्र. 75.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "नेरुळ विभागातील जुईनगर से-23 व जुईपाडा गांव अंतर्गत रस्त्यांची डांबरीकरण करणे व उर्वरीत गटर पदपथांची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 67 लाख, 21 हजार 739 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **ता.का.क्र. 47.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | ऐरोली से-15 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जवळील म.रा.वि.वि. कंपनीचे उपकेंद्र प्लॉट नं. -12 से-14 स्थलांतरीत करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./119/2018. |
| **ठराव क्र. 76.**<br>**दिनांक 19 जानेवारी 2018.** | "ऐरोली से-15 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जवळील म.रा.वि.वि. कंपनी उपकेंद्र प्लॉट नं.12, से-14 येथे स्थलांतरीत करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 8 कोटी, 33 लाख, 41 हजार 193 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **स्थगित.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**